MHAU070013202024

## निशाणी क्र. ५ खालील आदेश

अर्जदाराने सदरचा अर्ज ''कौटुंबिंक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५'' चे कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी असून त्यांचा विवाह दि. १९.०१.२०२१ रोजी मौजे माहुली, ता. गंगापूर येथे झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ कडे नांदण्यासाठी मौजे वडाळा महादेव ता. श्रीरामपुर येथे गेली तेथे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे एकत्रीत राहु लागले. गैरअर्जदार क्र. ४ ते ६ हे गैरअर्जदार क्र. १ ते ३ चे नातेवाईक आहेत.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, लग्नानंतर सुरूवातीपासुन गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचा सहवास टाळत होता. गैरअर्जदार क्र. २ ही रोज रात्री गैरअर्जदार क्र. १ यास झोपेच्या वेळी गोळया औषधे देत होती. गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्या अशा वागण्यामुळे अर्जदाराच्या मनावर त्याचा प्रचंड परिनाम झाला व ती नैराश्यामध्ये गेली. त्यामुळे दिवसेंदिवस अर्जदाराची शारिरिक व मानसिक स्थिती खराब होउ लागली. गैरअर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदार क्र. १ च्या आजाराची माहीती अर्जदारापासुन लपवुन ठेवत होते. अर्जदारास गैरअर्जदार क्र. १ व २ यांची वागणुक असहय झाल्यानंतर तिने माहेरकडील नातेवाईकांना त्याबाबत माहीती दिली. तिच्या आई वडीलांनी गैरअर्जदारांना विचारणा केली

असता गैरअर्जदार हे अर्जदार हिच्या डोक्यावर परिणाम झाला असुन तिला मानसोपचार तज्ञाच्या उपचाराची गरज आहे असे म्हणु लागले. अर्जदार ही प्रचंड नैराश्यामध्ये गेल्यामुळे गैरअर्जदार क्र. २ ही आवश्यकता नसतानीही अर्जदार ही वेडी झाली आहे असे भासविण्याकरीता तिला सुरुवातीला भोंदुगीरी करण्याा-या वेगवेगळ्या लोकांकडे घेवून जावु लागली व गरज नसतांनीही तिला वेडयाच्या दवाखान्यामध्ये घेवुन गेली.

४. अर्जदार पुढे असे कथन करते की, अर्जदाराच्या माहेरच्या नातेवाईकांनी गैरअर्जदार क्र. १ च्या आजाराबाबत गैरअर्जदारांना वारंवार विचारना करण्यास सुरुवात केली त्यामुळे गैरअर्जदार क्र. २ ही अर्जदाराचा शारिरिक व मानसिक छळ करू लागली. पुढे गैरअर्जदार हे अर्जदारास तुझ्या वडीलांकडुन शेती विकत घेण्याकरीता पाच लाख रूपये घेवुन ये अशी मागणी करू लागले. गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदारास दिवस दिवसभर उपाशी पोटी ठेवुन तिच्याकडुन घरातील सर्व अतिरिक्त कामे करून घेत असे त्यामुळे अर्जदाराची शारिरिक परिस्थिती दिवसेंदिवस ढासळत गेली. शेवटी दिनांक २५/०१/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारास मारहाण केली व तुझ्या वडीलांकडुन पाच लाख रूपये घेवुन ये नसता आम्ही तुला नांदविणार नाही, असे म्हणुन तिस घराबाहेर काढुन दिले. त्यामुळे तेव्हापासुन अर्जदार ही नाईलाजाने तिच्या आई वडीलांबरोबर राहत आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा कायमस्वरूपी नोकरीस असून त्यास रक्कम रू. ४०,०००/- प्रति महा पगार मिळतो. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना ६ एकर २० गुंठे बागायती शेती आहे. तसेच गाई म्हशी आहेत. गैरअर्जदार क्र. ३ हा दुग्धव्यवसाय करतो. त्यातून त्यांना वर्षाकाठी १० ते १२ लाख रूपये उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदाराची अर्जदाराला दैनंदिन खर्चाकरीता अंतरिम पोटगी

रक्कम रू. १०,०००/- देण्याची ऐपत आहे. सदरचा मूळ अर्ज निकाली काढण्यास अवधी लागणार असून दरम्यानच्या काळात अर्जदाराला दैनंदिन खर्चाकरीता अंतरिम पोटगी आवश्यक असल्याने सदरचा अर्ज मंजूर करावी अशी तिने विनंती केली आहे.

५. गैरअर्जदारांनी सदर अर्जावर नि. क्र. १२ अन्वये म्हणणे दाखल करून अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. परंतु विवाह व नातेसंबंध मान्य केले आहेत. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदारास लग्नाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच सत्य नारायण पुजेच्या दिवशी चक्कर येवु लागली होती. त्यामुळे गैरअर्जदाराने त्वरीत डॉक्टरकडे तिचा उपचार केला. त्यानंतर अर्जदार हि परत मुळासाठी माहेरी गेली व परत मुळानंतर सासरी आल्यावर अर्जदार हि घरात एकटी बसायची व गैरअर्जदारांमध्ये मिसळत नव्हती, परंतु नविन असल्यामुळे करमत नाही असे गैरअर्जदारांना वाटायचे अर्जदार हि स्वयंपाक वगैरे करत असतांना तिचे व्यवस्थीत लक्ष नसायचे. पुढे दोन महिन्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदारास आस्था हॉस्पीटल येथे उपचारासाठी आठ दिवस ॲडमिट केले होते. त्यावेळी डॉक्टरांनी डोळ्याची टेस्ट करायला सांगीतली होती. परंतु अर्जदाराच्या वडीलांनी औरंगाबादला टेस्ट करू असे सांगुण अर्जदारास घेवुन गेले परंतु त्यांनी डोळ्याची टेस्ट केली नाही. त्यानंतर अर्जदार चांगली झाली आहे असे सांगुण तीन महिन्यानंतर तिला सासरी आणुन सोडले परंतु तिचेत काही एक फरक जाणवला नाही. कारण, अर्जदार हि पुर्वीप्रमाणे एकटी बसत होती, जेवण करत नव्हती व सारखा मोबाईल बघत होती. अर्जदार हि जेवण करत नसल्यामुळे गैरअर्जदाराने तिला अहमदनगर येथील पोटाच्या डॉक्टरकडे उपचारासाठी घेवुन जावुन उपचार केला. परंतु तरी देखील अर्जदार चांगली झाली नाही त्यामुळे गैरअर्जदार क १ हा देखील मानसीक तनावामध्ये जीवन जगु लागला.

६. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराचा विविध दवाखान्यामध्ये उपचार केला परंतु अर्जदारामध्ये कोणत्याही प्रकारचा फरक झाला नाही. तिने तिच्या भावाला सासरी बोलावुन घेतले व बॅगमध्ये तिचे दागदागिणे, कपडे लत्ते इत्यादी सामान घेवुन गैरअर्जदारांना कोणालाही न सांगता निघुन गेली. अर्जदाराच्या वरील नमुद उपचाराकरीता झालेल्या खर्चामुळे गैरअर्जदार हे कर्ज बाजारी झाले होते व त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याने दहा लाख रूपयांचे कर्ज काढलेले असल्याने गैरअर्जदार क्र. १ यास असलेला तीस हजार रूपये पगारातुन कर्जाच्या हप्त्याची रक्कम वजा होवुन फक्त बारा हजार रूपये प्रतिमहिना पगार मिळत आहे. अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे साडेसहा एकर बागयती शेती नसुन केवळ दिड एकर शेती गैरअर्जदार क्र. २ च्या नावे आहे व त्यामध्ये गैरअर्जदार क्र. ३ हा शेती करून त्याची व त्याचे कुटुंबाची उपजिविका भागवितो. या व्यतिरिक्त त्यास इतर दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट अर्जदार ही शेती व शिलाई काम करून तिचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तसेच अर्जदारास लाडकी बहिण योजने अंतर्गत १५००/- रूपये प्रतिमहिना मिळत आहे. अर्जदाराने स्वतःहुन गैरअर्जदार क्र. १ याचा त्याग केलेला असल्याने अर्जात विनंती कलमात नमुद केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास ती पात्र ठरत नाही. सबब त्यांनी अंतरिम पोटगी मिळणे बाबतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अर्जदाराने निशाणी क्र. ६ अन्वये व गैरअर्जदारांनी निशाणी क्र. १३ अन्वये दाखल केलेल्या मालमत्ता व उत्तरदायित्व बाबतचे प्रतिज्ञाप्रत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

८. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केलेले

असल्याने ती त्याची पत्नी आहे हे शाबीत झालेले आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे कौटुंबीक संबंध असल्याचे सिध्द होते. अर्जदाराने तिच्या मूळ अर्जामध्ये गैरअर्जदारांकडून होणा-या शारिरीक व मानसीक त्रासाबददल इत्यंभूत माहिती देऊन त्याबाबत विवेचन केलेले आहे. उलटपक्षी गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे गैरअर्जदाराने मान्य केलेले आहे. जेंव्हापासून अर्जदार तिच्या माहेरी राहते तेंव्हापासून तिच्या पालन पोषणाची अगर उदरनिर्वाहाची गैरअर्जदार क्र. १ ने काहीही जबाबदारी उचलली नाही हे गैरअर्जदारांच्या लेखी म्हणण्यात दिसून येते.

९. अर्जदाराने गैरअर्जदाराकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) ची अंतरीम पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र. १ हा कायमस्वरूपी नोकरीस असून त्यास रक्कम रू. ४०,०००/- प्रति महा पगार मिळतो. गैरअर्जदाराने नोकरी असल्याचे मान्य केले आहे. परंतु पगार रक्कम रू. ३०,०००/- मिळतो. त्यातून त्याला हप्ते वजा जाता रक्कम रू. १२,०००/- शिल्लक राहतात व ते त्याला स्वत:च्या व आईच्या उदरनिर्वाहाकरीता व औषधोपचाराकरीता खर्च करावे लागतात असे गैरअर्जदाराचे कथन आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना ६ एकर २० गुंठे बागायती शेती आहे. तसेच गाई म्हशी आहेत. गैरअर्जदार क्र. ३ हा दुग्धव्यवसाय करतो. त्यातून त्यांना वर्षाकाठी १० ते १२ लाख रूपये उत्पन्न मिळते. परंतु अभिलेखावर दाखल असलेला गट क्र. १९६ चा ७/१२ उतारा पाहिल्यास असे दिसते की त्यावर पिकाचे नाव या रकान्यामध्ये सोयाबीन असा उल्लेख आहे. यावरून सदर क्षेत्र बागायती आहे असे म्हणता येणार नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे नाव ७/१२ उता-यावर ४७ गुंठे क्षेत्रासाठी सामाईकात असल्याचे दिसून येते. यावरून गैरअर्जदारांना शेतजमिनीतून वर्षाकाठी १० ते १२

लाख रूपये उत्पन्न मिळते असे म्हणणे न्यायोचित होणार नाही. परंतु पत्नी या नात्याने गैरअर्जदाराने अर्जदाराचा सांभाळ करणे आवश्यक असल्याने तिला उदरनिर्वाहासाठी, दैनंदिन खर्चासाठी व औषधोपचारासाठी योग्य ती रक्कम अंतरिम पोटगी म्हणून देणे न्यायोचित होणार आहे. अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून तिची कोणतीही जबाबदारी गैरअर्जदाराने घेतलेली नाही. गैरअर्जदारास नोकरीतून रक्कम रू. ३०,०००/- उत्पन्न मिळते ही बाब त्याने मान्य केली आहे. तसेच त्यास त्याच्या नावे असलेल्या शेतीतूनही उत्पन्न मिळते. सध्याच्या परिस्थितीमध्ये एखाद्या व्यक्तीला जगण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम तसेच दैनंदिन खर्च व औषधोपचारासाठी आवश्यक असलेली रक्कम व महागाई यांचा विचार केला असता तसेच गैरअर्जदाराचे उत्पन्न पाहता त्याची अर्जदाराला दैनंदिन खर्चाकरीता व औषधोपचाराकरीता अंतरिम पोटगी रक्कम रू. ५,०००/- प्रति महिना देण्याची ऐपत आहे असे मत मी नोंदवित आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते असा निष्कर्ष नोंदवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा (निशाणी क्र. ५) चा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ ने मुळ अर्ज दाखल तारखेपासून ते अर्जाचा निकाल लागेपावेतो अर्जदारास दरमहा रक्कम रुपये ५,०००/-(रक्कम अक्षरी रुपये पाच हजार मात्र) अंतरीम पोटगी दयावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2025.01.10 11:30:07 +0530

दिनांकः ०८.०१.२०२५ ( एस.वाय. वाकचौरे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गंगापूर.